# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस

THANE POLICE COMMISSIONERATE

दिनांक : ०३/०४/२०२४

## प्रेसनोट

## गुन्हे शाखा,घटक -३ कल्याण , कडुन २४ तासाच्या आतमध्ये खुनाच्या गुन्हयाचा उलगडा.

दिनांक ०३/०४/२०२४ रोजी कोळशेवाडी पोलीस ठाणे हद्दीत सुचक नाका, कल्याण पुर्व येथे मयत इसम नामे सुरज सोमा हिलम वय २५ वर्षे यास २० ते २५ वर्षे वयाच्या अनोळखी ०६ इसमानी लाकडी फळीने, झाडुने, व दगड फेकुन गंभीर जखमी करून जिवे ठार मारले बाबत मयत इसमाचा भाउ नामे पिंटया सोमा हिलम याचे फिर्यादीवरून **कोळशेवाडी पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ४६८/२०२४ भादविक ३०२, १४३, १४७, १४८, १४९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.** नमुद गुन्हयाचे घटनास्थळी इकडील घटकातील पोलीस अधिकारी व पोलीस अमंलदार यांनी तात्काळ भेट देवुन नमुद गुन्हयाचा समांतर सुरू करून सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले. घटनास्थळावरील प्राप्त सीसीटीव्ही फुटेजवरून गुन्हयातील आरोपीत निष्पन्न केले. तद्नंतर इकडील घटकातील पोलीस अमलदार/७६३७ मिथुन राठोड यांना गुप्त बातमीदार कडुन माहिती मिळाली की, वर नमुद प्राप्त सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसणारे ०२ संशयीत आरोपीत व ०१ विधीसंघर्षित बालक हे सुचक नाका, रिक्षा स्टॅन्ड जवळ कल्याण पुर्व येथे येणार आहेत. सदर बातमीच्या अनुषंगाने इकडील घटकातील पोलीस अधिकरी व अमंलदार यांनी सापळा कारवाई करून प्रस्तुत गुन्हयातील संशयीत आरोपीत नामे **१) रूपेश महादेव कांबळे वय १९ वर्षे रा. महात्मा फुले नगर झोपडपटटी, सुचक नाका, कोळशेवाडी कल्याण पुर्व. २) मोहन रमेश बनसोडे वय १८ वर्षे रा. रा. महात्मा फुले नगर झोपडपटटी, सुचक नाका, कोळशेवाडी कल्याण पुर्व. यांना तसेच ०१ विधीसंघर्षित बालक** यांना घेवुन युनिट कार्यालयात आले.

तद्नंतर नमुद संशयीत आरोपीत व विधिसंघर्षित बालक यांचेकडे प्रस्तूत गुन्हयाबाबत अधिक विचारपुस करता ताब्यात असलेला संशयीत इसम नामे मोहन रमेश बनसोडे यांने माहिती दिली की, त्याचे मामास यातील मयत इसम नामे सुरज सोमा हिलम यांने दारू प्यायला बसले असताना उसणे घेतलेले पैसे देणे–घेण्यावरून मारहाण केल्याचा राग मनात धरून वरिल संशयीत आरोपीत नामे १) रूपेश महादेव कांबळे वय १९ वर्षे २) मोहन रमेश बनसोडे वय १८ वर्षे व एक विधीसंर्घर्षित बालक तसेच त्यांचे अजुन साथीदार पाहिजे आरोपीत यांनी मिळुन मयत इसम सुरज सोमा हिलम यास लाकडी फळीने, झाडुने, व दगड फेकुन मारून गंभीर जखमी करून जिवे ठार मारले असल्याचे सांगितले. त्यांनतर नमुद संशयीत आरोपीत व विधिसंघर्षित बालक यांचा वर नमुद गुन्हयात सहभाग असल्याची त्यांनी कबुली दिल्याने वर नमुद तिघांना पुढील कारवाई करीता कोळशेवाडी पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे.

अशा प्रकारे गुन्हे शाखा घटक –३ कल्याणचे पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी २४ तासाच्या आत तपास करून खुनाचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

प्रस्तुत यशस्वी कामगिरी मा. श्री. पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस उप आयुक्त, गुन्हे व मा. श्री. निलेश सोनावणे सहा.पोलीस आयुक्त, (शोध १) गुन्हे ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नरेश पवार, सपोनि/संदिप चव्हाण, पोहवा/दत्ताराम भोसले, पोहवा/अनुप कामत, पोहवा/किशोर पाटील, पोना/दिपक महाजन, पोना/सचिन वानखेडे, पो.कॉ./मिथुन राठोड, पो.कॉ./विनोद चन्ने, पो.कॉ./गुरूनाथ जरग, पो.कॉ./गोरक्ष शेकडे, पो.कॉ./रविंद्र लांडगे, चालक पोहवा/अमोल बोरकर यांनी केलेली आहे.

---oooo---